सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २४९

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (प्र.स.क्र.३) **यांचे दि.११/०५/२०२२ चे विषयपत्र महाराष्ट्र** महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड स.नं.२००/२ अ या मिळकती मधून जाणाऱ्या १०० फुटी आर.पी.रस्त्याचे नुकसान भरपाईबाबत सौ.मंगल आदगोंडा पाटील यांनी लेखी अर्जाद्वारे मागणी केलेली आहे.

श्री.आदगोंडा रामगोंडा पाटील व इतर ८ यांचे वमुधा सौ.मंगल आदगोंडा पाटील यांनी सदर रेखांकनास अंतिम मान्यता मिळणेसाठी दि.०४/०९/२००२ रोजी प्रस्ताव दाखल केलेला होता. सदर प्रस्तावा सोबत रेखांकनामधील अंतर्गत रस्ते,खुली जागा व १०० फुटी आर.पी.रस्ता दि.१६/०७/२००२ रोजी महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेले आहे. सदर रेखांकनास अंतिम मंजूरी दि.३०/१०/२००२ रोजी देण्यात आलेली आहे. सदर कब्जेपट्टीनुसार अंतर्गत रस्ता, खुली जागा व आर.पी.रस्त्याचे क्षेत्रास महानगरपालिकेचे ७/१२ उताऱ्यावर नावाची नोंद झालेली आहे. सदर आर.पी. रस्त्याचे नुकसान भरपाई देणेचे झालेस रेखांकनामध्ये आर.पी.रस्त्याच्या मनपाच्या मंजूर विकास योजना नकाशामध्ये हा.स.नं.२००/२ अ या मिळकती मधून लांबी १२० मी.लांबीने जातो. विकास नियंत्रण नियमावलीनुसार रस्ता लांबी पाहता, ९.०० मी रस्त्याखालील क्षेत्र विनामोबदला देणे आवश्यक असून, उर्वरित क्षेत्र म्हणजे १२० मी. X २१० = २५२० चौ.मी. क्षेत्राची नुकसान भरपाई देय होत आहे.

तथापि, अर्जदार यांना सदर रस्त्याची नुकसान भरपाई महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ नुसार खाजगी वाटाघाटीने संपादन करणे,भूमी संपादन अधिनियम २०१३ नुसार अथवा सदर बाधित क्षेत्राच्या नुकसान भरपाई हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) स्वरुपात आवश्यक असलेस त्याचा लेखी खुलासा सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार अर्जदार यांनी खाजगी वाटाघाटीने सदर क्षेत्र संपादन करुन आर्थिक मोबदला मिळावा अशी मागणी केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता अर्जदार यांचे मालकीच्या क्षेत्रातील विकास योजनेने बाधीत रस्त्याखालील २५२० चौ.मी. क्षेत्राचे जिल्हाधिकारी,सांगली कार्यालयामार्फत भूसंपादन करणेस व भूसंपादन प्रक्रियेत निश्चित होणारे मुल्य आदा करणेस किंवा महानगरपालिका स्तरावर खाजगी वाटाघाटीने / अन्य विहित पद्धतीने भूसंपादन करणेस व त्यांचे होणारे मुल्य आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.राजेंद्र कुंभार.

अनुमोदक :- श्री.संतोष पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi.

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २५०

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (प्र.स.क्र.३) यांचे दि.११/०५/२०२२ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड स.नं.२०७/१+२/२ याचा नविन स.नं.१५९/१/२/२ या जमिनीमधून जाणाऱ्या १८.०० मी.व ३०.०० मी. रस्त्याची नुकसान भरपाईबाबत श्री.सुरगोंडा बाळगोंडा पाटील यांनी लेखी अर्जाद्वारे मागणी केलेली आहे.

श्री.बाबगोंडा बाळगोंडा पाटील व इतर २ यांनी सदर रेखांकनास अंतिम मान्यता मिळणेसाठी दि.१५/०५/२००७ रोजी प्रस्ताव दाखल केलेला होता. सदर प्रस्तावा सोबत रेखांकनामधील अंतर्गत रस्ते,खुली जागा व १०० फुटी आर.पी.रस्ता दि.१८/०४/२००७ रोजी महानगरपालिकेच्या ताब्यात मुळ मालक श्री.बाबगोंडा बाळगोंडा पाटील व इतर २ यांनी दिलेली आहे. सदर रेखांकनास अंतिम मंजूरी दि.१८/०५/२००७ रोजी देण्यात आलेली आहे. सदर कब्जेपट्टीनुसार अंतर्गत रस्ता, खुली जागा व आर.पी.रस्त्याचे क्षेत्रास महानगरपालिकेचे ७/१२ उताऱ्यावर नावाची नोंद झालेली आहे. सदर मुळ मालक यांचेपैकी श्री.बाबगोंडा बाळगोंडा पाटील व श्री.आदगोंडा बाळगोंडा पाटील यांनी श्री.सुरगोंडा बाळगोंडा पाटील यांना दि.१२/०९/२००७ रोजीच्या संमत्तीपत्राने सदर रस्त्याच्या नुकसान भरपाईबाबत सर्व अधिकार त्यांना दिलेले आहेत. त्यानुसार श्री.सुरगोंडा बाळगोंडा पाटील यांनी दि.०७/१०/२०१९ व दि.०७/०१/२०२१ रोजीचे अर्जान्वये आर.पी. रत्याने बाधीत क्षेत्राची नुकसान भरपाई मागणी केलेली आहे.

सदर आर.पी.रस्त्याची नुकसान भरपाई देणेचे झालेस रेखांकनामध्ये आर.पी.रस्ता मनपाच्या मंजूर विकास योजना नकाशानुसार ३०.०० मी.रस्ता हा २४.०० मी करणेत आलेला आहे. तथापि, मंजूर रेखांकनानुसार ३०.०० मी.रस्त्याच्या रुंदीनुसार कब्जेपट्टी प्राप्त असून, ७/१२ पत्रकी मनपाच्या नावाची नोंद झालेली आहे. विकास नियंत्रण नियमावलीनुसार रस्ता लांबी पाहता, ९.०० मी. रस्त्याखालील क्षेत्र विनामोबदला देणे आवश्यक असून, उर्वरित क्षेत्र म्हणजे २१ मी. X ५६.५० = ११८७ चौ.मी. क्षेत्राची नुकसान भरपाई देय होत आहे. तसेच १८.०० मी.रस्त्याचे क्षेत्र १३६३.९० चौ.मी.असून, ९.००मी. रस्त्याखालील क्षेत्र विना मोबदला देणे आवश्यक आहे. त्यानुसार उर्वरित क्षेत्र म्हणजे १३६३.९० मी. / २ = ६८१.५० चौ.मी. क्षेत्राची नुकसान भरपाई देय होत आहे.

तथापि, अर्जदार यांना सदर रस्त्याची नुकसान भरपाई महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ नुसार खाजगी वाटाघाटीने संपादन करणे,भूमी संपादन अधिनियम २०१३ नुसार अथवा सदर बाधित क्षेत्राच्या नुकसान भरपाई हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) स्वरुपात आवश्यक असलेस त्याचा लेखी खुलासा सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार अर्जदार यांनी खाजगी वाटाघाटीनु सदर क्षेत्र संपादन करुन आर्थिक मोबदला मिळावा अशी मागणी केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता अर्जदार यांचे मालकीच्या क्षेत्रातील विकास योजनेने बाधीत रस्त्याखालील ११८७ चौ.मी. आणि ६८१.५० चौ.मी. क्षेत्राचे जिल्हाधिकारी,सांगली कार्यालयामार्फत भूसंपादन करणेस व भूसंपादन प्रक्रियेत निश्चित होणारे मुल्य आदा करणेस किंवा महानगरपालिका स्तरावर खाजगी वाटाघाटीने / अन्य विहित पद्धतीने भूसंपादन करणेस व त्यांचे होणारे मुल्य आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. राजेंद्र कुंभार.

श्री. संतोष पाटील.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi.

महापौर,

अनुमोदक

महापालिका सचिव,
मि. मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २५१

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.मनोज रघुनाथ सरगर यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२२/प्र.क्र.९८(४२)/न.वि.-१६ मंत्रालय मुंबई दि.३० मार्च २०२२ रोजीचे शासन निर्णयान्वये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास या योजनेंतर्गत र.रु.५ कोटी इतका निधी मंजूर झालेला आहे. सदर निधीमधून शासन निर्णयातील नमुद शर्ती-अटीस अधीन राहून त्यामधील नमुद एकूण २२ कामांकरीता प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत असून, शासन निर्णयातील अट क्र.०२ नुसार सदर कामासाठी कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका असलेने, त्यानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२२/प्र.क्र.१००(११)/न.वि.-१६ मंत्रालय मुंबई दि.३० मार्च २०२२ रोजीचे शासन निर्णयान्वये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास या योजनेंतर्गत र.रु.५ कोटी इतका निधी मंजूर झालेला आहे. सदर निधी मधून शासन निर्णयातील नमुद शर्ती-अटीस अधीन राहून त्यामधील नमुद एकूण ३५ कामांकरीता प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत असून, शासन निर्णयातील अट क्र.०२ नुसार सदर कामासाठी कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका असलेने, त्यानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-मनपा-२०२२/प्र.क्र.१००(१२)/न.वि.-१६ मंत्रालय मुंबई दि.१३ जून २०२२ रोजीचे शासन निर्णयान्वये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास या योजनेंतर्गत र.रु.५ कोटी इतका निधी मंजूर झालेला आहे. सदर निधी मधून शासन निर्णयातील नमुद शर्ती-अटीस अधीन राहून त्यामधील नमुद एकूण ३३ कामांकरीता प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत असून, शासन निर्णयातील अट क्र.०२ नुसार सदर कामासाठी कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका असलेने, त्यानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Manoj S. Sargar श्री.मनोज सरगर. ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने. D.P. Suryavanshi महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २५२

दिनांक :- २०/०६/२०२२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.विनायक रमेश सिंहासने यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली जिल्ह्याच्या सर्वागीन विकासासाठी खेळ हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. सांगली जिल्हा हे कबड्डी आणि ऍथलेटिक्सचे माहेरघर मानले जाते. सांगली जिल्हात अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडूं निर्माण झाले आहेत. त्यामध्ये कुस्ती खेळामध्ये हिंदकेसरी पै.मारुती माने आणि आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटपटू स्मृती मानधना हे सांगली जिल्हाचे दोन रत्न आहेत.

केंद्र सरकारच्या खेलो इंडिया या प्रकल्पांतर्गत सांगली शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टेडियमचा समावेश करणेसाठी र.रु.६४ कोटी रक्कमेचा प्रस्ताव तयार केला असून, शहराच्या मध्यभागी स्टेडियमसाठी पुरेश जागा उपलब्ध असल्याने सदर प्रकल्पांतर्गत सिंथेटिक ट्रॅक, फुटबॉल आणि हॉकी मैदान, कबड्डी मैदान, बास्केटबॉल मैदान, टेनिस कोर्ट, क्लब हाऊस, पार्किंग आणि गॅलरी यासह इतर सुविधांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार खेलो इंडिया केंद्रशासनाच्या युवक कल्याण व क्रिडा मंत्रालयाकडे सांगली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टेडियमचा समावेश एथलेटिक्स स्पोटर्स सेंटर मध्ये करण्यासाठी मा.राज्यशासनाकडे मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.पांडूरंग मार्तंड कोरे व श्री.निरंजन सुरेश आवटी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. सांगली जिल्ह्यात अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण झाले आहेत. त्यात कुस्ती, क्रिकेट खेळामध्ये जिल्ह्याचे नांव लौकीक झाले आहे.

केंद्र सरकारच्या खेलो इंडिया या प्रकल्पांतर्गत मिरज शहरातील महापालिकेच्या मालकीचा सर्व्हे नं.५/१ येथे अद्यावत स्टेडीयम विकसित करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. सदर स्टेडीयम विकसित केल्यास मिरज शहराचा लौकीक वाढून खेळाडू तयार होणेस मदत होणार आहे. त्या प्रकल्पांतर्गत सदर ठिकाणी सिंथेटिक ट्रॅक, फुटबॉल, हॉकी, कबड्डी, बास्केटबॉल, टेनिस कोर्ट, क्लब हाऊस, पार्किंग, गॅलरी यासह इतर सुविधांचा समावेश करण्यात आला असून त्यासाठी सदर ६० कोटीचा रुपयांचा प्रस्ताव तयार करणेत आलेला आहे.

त्यानुसार खेलो इंडिया केंद्रशासनाच्या युवक कल्याण व क्रिडा मंत्रालयाकडे मिरज येथील सर्व्हे नं.५/१ या क्रिडांगणासाठी आरक्षित असलेल्या अंदाजे ५ हेक्टर जागेमध्ये अद्यावत स्टेडीयमचा समावेश एथलेटिक्स स्पोटर्स सेंटर मध्ये करण्यासाठी मा.राज्यशासनाकडे मान्यतेस्तव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

महापालिका अधिनियम
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Sanjaranjhi

अनुमोदक :- श्री.पांडूरंग कोरे

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २५३

दिनांक :- २०/०६/२०२२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.२०/०६/२०२२ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील आमराई उद्यानामध्ये विविध प्रकारचे वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. सदर वृक्षांना दैनंदिन पाणी देणे आवश्यक असलेने, त्यांना पाणी हे पिण्या योग्य असलेले देण्यात येते. आमराई उद्यानालगत मोठ्या प्रमाणात रहिवास संकूले आहेत. सदर संकुलामधून निर्माण होणारे मलमिश्रीत पाणी सेप्टीक टाकीमधून बाहेर येत असून ते पाणी आमराई उद्यानामध्ये वाहून येत असल्यामुळे दुर्गंधी येत असून, डासोत्पत्ती होवून रोगराई पसरुन त्या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांचे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरीता आमराई उद्यानामध्ये नागरी वस्तीमधील मलमिश्रीत पाण्याचा पुर्नवापर करण्याच्या दृष्टीने मलनि:सारण प्रकल्प उभारणी करणे आवश्यक आहे. जेणेकरुन आमराई उद्यानामधील वृक्षांना पिण्यायोग्य पाण्याचा वापर न करता प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करता येईल.

रोटरी क्लब,सांगली यांनी दि.२०/०५/२०२२ रोजीचे पत्रान्वये २००KLD मलनि:सारण (STP) प्रकल्प आमराई येथे उभारणी करुन प्रकल्प पुर्ण झालेनंतर ते महानगरपालिकेच्या ताब्यात देणेत येईल असे कळविलेले असून, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका व रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने सदरचा प्रकल्प उभारण्याकीरता र.रु.६० लाख इतका खर्च अपेक्षित आहे. यासाठी रोटरी कल्ब र.रु.३६ लाख, इतर सामाजिक संस्था र.रु.१० लाख असे एकूण र.रु.४६ लाख खर्च करणार आहेत. उर्वरित र.रु.१४ लाख महानगरपालिका हिस्सा असणार आहे. तसेच याकामी आवश्यक असणारे बांधकाम,ड्रेनेज जोडणी,पाईप लाईन,विद्युत व्यवस्था हे महानगरपालिकेमार्फत होणार असून, त्यासाठी अंदाजे र.रु.२४ लाख इतका खर्च अपेक्षित आहे.

उक्त प्रकल्प कार्यान्वीत झालेस मलनि:सारणद्वारे प्रक्रिया करण्यात आलेल्या पाण्याचा पुर्नवापर आमराई येथील वृक्षांना पाणी घालणेसाठी,आग विझविण्यासाठी, बांधकामाकरीता इ.करीता वापर होणार आहे. सदर प्रकल्पामुळे स्वच्छ सर्वेक्षण अभियान,माझी वसुंधरा अभियान तसेच सफाई सुरक्षा चॅलेंज मित्र अभियानामध्ये गुणांकन प्राप्त होण्यास मदत होणार आहे. यासाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका व रोटरी क्लब,सांगली यांच्या विद्यमाने आमराई उद्यान येथे २००KLD मलनि:सारण (STP) प्रकल्प उभारण्याकरीता व याकामी महानगरपालिकेचा हिस्सा र.रु.१४ लाख तसेच बांधकाम,ड्रेनेज जोडणी,पाईप लाईन,विद्युत व्यवस्था इत्यादीकरीता अंदाजे र.रु.२४ लाख असे एकूण र.रु.३८ लाख इतक्या खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

आ.अ.

सूचक :- श्री.संजय मेंढे

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.योजी मोहिते

D.P.Suryavanshi.

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २५४

विषय क्रमांक :- ऐन.

दिनांक :- २०/०६/२०२२

सोबतची सन्मा.सदस्य श्री.मनोज रघुनाथ सरगर यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका दि.०९ फेब्रुवारी १९९८ रोजी अस्तित्वात आली. महापालिका स्थापन झाल्यामुळे महापालिकेकडे विविध पदावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी येत असतात. महापालिकेच्या मंजूर पदावर प्रतिनियुक्तीसाठी अधिकारी यांचे प्रमाण निश्चित करणेत आलेले आहे. त्यामध्ये महापालिकेकडे मंजूर असलेल्या दोन अतिरिक्त आयुक्तांपैकी एक अतिरिक्त आयुक्त प्रतिनियुक्तीवरील व एक अतिरिक्त आयुक्त स्थानिक केडरवरील तसेच, दोन उपायुक्तांपैकी एक उपायुक्त प्रतिनियुक्तीवरील व एक उपायुक्त स्थानिक केडरवरील त्याच बरोबर चार मंजूर सहाय्यक आयुक्तांपैकी दोन सहाय्यक आयुक्त प्रतिनियुक्तीवरील व दोन सहाय्यक आयुक्त स्थानिक केडरवरील अशी पदे मंजूर आहेत. तथापि, गेल्या काही वर्षामध्ये मा.शासनाकडून दोन-दोन अतिरिक्त आयुक्त, दोन-दोन उपायुक्त आणि चार सहाय्यक आयुक्त असे अधिकारी पाठविणेत येत आहेत.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका ही ड वर्ग महापालिका असल्याने व महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत अल्प असल्याने महापालिकेस प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांचेवर होणारा वेतन भत्ते व इतर अनुषंगिक सोई-सुविधांसाठी होणारा खर्च परवडणारा नाही असे या सभेचे मत आहे. त्यामुळे सद्या कार्यरत असलेल्या काही प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांना मा.शासन सेवेत परत पाठविणेत यावे असे सन्मा.सदस्यांनी सभागृहामध्ये मागणी केलेली असल्याने, सदस्यांच्या भावना लक्षात घेता ही सभा खालील अधिकारी यांना मा.शासन सेवेत परत पाठविणेस आदेशित करीत आहे.

अ.क्र.	अधिकारी यांचे नाव	पदनाम
१.	श्री.चंद्रकांत खोसे	अतिरिक्त आयुक्त
२.	श्री.शिरिष धनवे	मुख्य लेखापरिक्षक
३.	श्री.अशोक कुंभार	सहा.आयुक्त, ई-गव्हर्नन्स् / विद्युत विभाग
४	श्री.प्रदिप डवरी	अंतर्गत लेखापरिक्षक

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

:- Manoj R. Sargar. श्री.मनोज सरगर.

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री.गोडजी मोहिते.